सं.फौ.ख. क्र.११३५/२०२५
निशाणी क्रमांक १ खाली.

पडताळणी

फिर्यादीची शपथेवर बी.एन.एस.एस. कलम २२३ अन्वये पडताळणी

मी देवाची शप्पथ घेवून खरे सांगते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | शामराव तुकाराम जाधव, |
| वय | - | ५४ वर्ष, कामधंदा -शेती, |
| राहणार | - | माळीवाडगांव, ता. गंगापुर. |

१. शेत गट क्र.५१, मौजे माळीवाडगांव ता. गंगापुर येथे माझी शेती आहे. संदिप जयराम बल्हाल यांची शेती आमच्या शेतालगत आहे. त्यांच्या व आमच्यामध्ये वांगेफोड वाटणी झाली होती. दि.०६.११.२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास मी, मी माझी पत्नी आशाबाई, माझा मुलगा राजेंद्र असे शेतात असताना आरोपी संदिप बल्हाल यांनी आमच्या शेताचे बांध फोडले त्यामुळे माझा मुलगा राजेंद्र त्यास जबाब विचारण्यास गेला असता जयराम बल्हाल, नारायण जयराम बल्हाल, संदिप जयराम बल्हाल व सखुबाई जयराम बल्हाल हे आमच्या शेतात आले. जयरामच्या हातात कु-हाळ होती. त्याने कु-हाडीच्या दांडयाने माझ्या मुलाच्या पाठीत, पायावर मारहाण केली. ईतर आरोपींनी हाताचापटाने मला व माझ्या पत्नीला मारहाण केली, शिवीगाळ केली व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे मी पोलिस स्टेशन लासुर येथे तिच्याविरोधात तक्रार दिली परंतु, पोलिसांनी फक्त अदखलपात्र गुन्हा नोंदविला व पुढील कार्यवाहीसाठी न्यायालयात जाण्यासाठी सांगितले. त्यामुळे मी आरोपीविरुध्द कडक शिक्षा व्हावी म्हणुन न्यायालयात फिर्याद दिली आहे. याव्यतिरिक्त मला अजुन काहीही सांगायचे नाही.

शामराव तुकाराम जाधव

.......................................

फिर्यादी/तक्रारदार ची सही

समक्ष

Agrawal

(एस.एस.अग्रवाल)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गंगापूर

दिनांक – १२/०३/२०२६